स्थापना - १९६८

संस्थापक: पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, डी.लिट्.

'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद'- कर्मवीर

**डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)**

ता.पलूस, जि. सांगली ४१६३०८

(महाराष्ट्र)

नॅक मानांकन : 'ए'

प्र.प्राचार्य

डॉ. टी.एस.भोसले.

M.Sc., Ph.D.

एस.टी.डी कोड- (०२३४६)

कार्यालय - २२२०३५

निवास - २२२००९

फॅक्स - २२२०३५

**E-mail** : ascc_rnagar@ymail.com.

# शैक्षणिक अभ्यासक्रम सहल अहवाल २०२२-२३

रयत शिक्षण संस्थेचे डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर. तालुका. पलूस. जिल्हा .सांगली. येथील इतिहास, भूगोल, मराठी ,भौतिकशास्त्र अशा विभागाची 'शैक्षणिक अभ्यास सहल'सोमवार, दिनांक २० फेब्रुवारी २०२३ व मंगळवार दिनांक २१ फेब्रुवारी २०२३ रोजी सातारा, वाई, पाचगणी, महाबळेश्वर, प्रतापगड, महाड, रायगड येथे गेलेली होती. या दोन दिवसीय सहलीमध्ये वाई येथील प्रसिद्ध गणपती मंदिर पाहिले. तसेच पाचगणीच्या टेबल लँडचा आनंद घेतला. पुढे महाबळेश्वर येथील महाबळेश्वर मंदिर ,पंचगंगा नद्यांचा उगम तसेच आर्थर पॉईंट व अन्य महत्त्वाची प्रेक्षणीय स्थळे पाहून प्रतापगड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या किल्ल्याचे विलोभनीय दर्शन व आनंद घेतला. पुढे महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी चवदार तळ्याचे पाणी आपल्या अनुयायासह प्राशन केले. अशा या पवित्र भूमीचे दर्शन घेऊन मनोमन आनंद देखील घेतला. २१ फेब्रुवारी २०२३ रोजी रायगड येथे रोपवे द्वारे आम्ही सर्व मुले व सहकारी प्राध्यापक यांनी रायगडवर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांचे सिंहासन, राजवाडा, ८ राण्यांचे महाल, अष्टप्रधान मंडळाची निवासस्थाने, बाजारपेठ, जगदीश्वर मंदिर, छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी, वाघ्या कुत्र्याची समाधी, टकमक टोक, हिरकणी बुरुज अशा विविध ऐतिहासिक स्थळांना भेटी देऊन त्याचा आनंद घेतला. त्यानंतर राजमाता जिजाबाई यांच्या समाधीचे दर्शन घेऊन त्यांच्या राजवाड्याची पाहणी केली.

एकंदरीत या अभ्यास व शैक्षणिक सहलीचा इतिवृत्तान्त आपल्यासमोर सादर करीत आहे. या शैक्षणिक सहलीसाठी आमच्या महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य, डॉ. टी. एस. भोसले यांनी आम्हाला सहलीस परवानगी देऊन मार्गदर्शन व सहकार्य केले. याशिवाय या सहलीमध्ये डॉ. अशोक खाडे, डॉ. गौरी पाटील, डॉ.नीता पाटील, प्रा. नम्रता कांबळे, प्रा. भाग्यवंत पि.के.इत्यादी सहकार्यांनी भाग घेतला होता. इतिहास विभाग प्रमुख म्हणून डॉ. राजेंद्र सोनावले यांनी या सहलीचे आयोजन, नियोजन व्यवस्थित केले. इतिहास विभागातील बी.ए. व एम. ए. चे ४ विद्यार्थी या सहलीमध्ये सहभागी झालेले होते. थोडक्यात ही सहल यशस्वी, आनंददायी झाली.






प्रमुख
इतिहास विभाग

प्र. प्राचार्य
आर्टस, सायन्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली).